दिनांक : २७.०८.२०१९

**विषय : गृहपालन व्यवस्था ई-निविदा सन २०१९-२०२१ या कालावधीसाठी ई निविदा करीता आयोजित निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त..**

गृहपालन व्यवस्था ई-निविदा सन २०१९-२०२१ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी ई निविदेसाठी निविदापूर्व बैठक दिनांक २६.०८.२०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता पीएमबी बिल्डींग, तिसरा मजला मजला येथे लेखाशाखेतील समिती कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

१. M/s D. M. Enterprises, Pune
२. M/s X-MEN Security & Housekeeping Services, Pune
३. M/s Sumeet Facilities Ltd, Pune
४. M/s Rising Facility Management, Mumbai
५. M/s D & F Shine Services Pvt. Ltd, Pune
६. M/s Morya Enterprises, Pune

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री.सतिश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री.प्रसाद आचार्य, उप निबंधक
३. श्री.देवराम शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण कक्ष
४. श्री.अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक
५. श्री.मुकुंद वीर, प्रकल्प सहायक (तांत्रिक)

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted आहे किंवा कसे या बाबतचा मुद्दा M/s X-MEN Security & Housekeeping Services चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | MSME चे प्रमाणपत्र जर भोजन व्यवस्था सेवेसाठी नोंदणी केली असेल व प्रमाणपत्र upload केले असेल तर EMD परत करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| २. | प्रत्येक वर्षी Turnover Certificate ५ कोटीचे सरसकट चालेल की फक्त हाऊसकिपिंग विषयीचेच असणे जरुरी आहे या बाबतचा मुद्दा M/s D. M. Enterprises चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | सन २०१५-१६, २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील प्रति वर्षाचे हाऊसकिपिंग विषयीचेच Chartered Accountant यांनी दिलेले वार्षिक किमान ५ कोटीचे Turnover Certificate आवश्यक आहे, असे सांगण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ३. | दर सादर करताना GST सह किंवा GST शिवाय सादर करावेत किंवा कसे याबाबत M/s Sumeet Facilities Ltd. चे प्रतिनिधी यांनी मुद्दा उपस्थित केला. | दर सादर करताना GST वगळून दर सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्याचे देयक सादर करताना अस्तित्वात असलेल्या अनुज्ञेय GST दरासह देयक अदा करण्यात येईल. |
| ४. | Services Charges मध्ये कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव आहे, असा मुद्दा M/s X-MEN Security & Housekeeping Services चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | Monthly Wage Structure-Annexure A-२ मधील पार्ट- B मधील मुद्दा क्र. ०७ चे अवलोकन करुन दर भरणे आवश्यक आहे. सदर दरावर न्युनतम दर असलेली निविदा L-१ ठरणार असे स्पष्ट करण्यात आले. |
| ५. | निविदेतील पान क्र. ०८ येथील मुद्दा क्र. १.९.८ मध्ये दिल्यानुसार साफसफाई साहित्याची खरेदी केल्यानंतर त्याची प्रतिपूर्ती यशदाकडून केली जाईल असे सांगितले आहे त्याबद्दल मार्गदर्शन करण्याबाबत M/s D. M. Enterprises चे प्रतिनिधी यांनी मुद्दा उपस्थित केला. | संस्थेच्या मागणीनुसार साफसफाई साहित्य खरेदी करुन त्याचे देयक सादर करणे आवश्यक आहे व त्यानुसार देयकाची प्रतिपूर्ती करण्यात येईल, असे सांगण्यात आले. |
| ६. | कचऱ्याची विल्हेवाट कोण लावणार असा मुद्दा M/s Rising Facility Management चे प्रतिनिधी यांनी उपस्थित केला. | THE DUTIES OF THE HOUSE KEEPING UNSKILLED MANPOWER मधील मुद्दा क्रमांक 1.10.2 अनुसार कचऱ्याची विल्हेवाट संबंधित ठेकेदाराने । संस्थेच्या आवाराबाहेर जबाबदारीने मनपा नियमानुसार करणे बंधनकारक आहे. |
| ७. | Wage Structure मध्ये काही बदल झाल्यास त्याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे का असा मुद्दा M/s D. M. Enterprises चे प्रतिनिधी यांनी यांनी उपस्थित केला. | Wage Structure मध्ये शासनाच्या नियमानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार, अनुज्ञेयता तपासून देयक अदा केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. |
| ८. | BoQ मध्ये न्युनतम दर कसे भरायचे याबाबत मार्गदर्शन करणेबाबत सर्व निविदादारांनी विनंती केली. | BOQ मधील दर Excel मध्ये upload करणे बाबत सूचना देण्यात आल्या. तसेच निविदेत नमूद केल्यानुसार Excel sheet मधील दर हे L-१ साठी ग्राह्य धरण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले. |

निविदा भरणे अगोदर संबंधित सर्व निविदादारांनी संपूर्ण निविदेचे काळजीपूर्वक वाचन करुन, सर्व कागदपत्रे निविदेतील मागणीनुसार upload करण्याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे संस्थेच्या वतीने सर्व निविदादारांच्या प्रतिनिधींना सूचना देवून बैठक समाप्त करण्यात आली.

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

प्रसाद आचार्य
(उप निबंधक)

देवराम शेळके
(लेखाधिकारी तथा प्रमुख, प्रापण)

सतिश तडकसे
(वित्तीय सल्लागार)